**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. दिवे यांच्यामार्फत :-**

१. वादग्रस्त मिळकती या टाकळीमिया या गावातील आहे. मी श्रीरामपुर येथे राहते. वादग्रस्त मिळकती या टाकळीमिया येथे कोठे आहेत, तसेच क्षेत्र किती आहे हेही सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र. ३ राजु हे माझे पती आहे. कांताबाई जयवंत सगळगिळे व जयवंत सगळगिळे हे माझे सासु-सासरे होते. प्रतिवादी हे सर्व विभक्त राहतात. माझे सासरे जयवंता हे अंदाजे २० वर्षापुर्वी मयत झाले असतील. जयवंता यांना ४ मुले नामे बापु, राजु, संजु व विजय सगळगिळे तर मुली २ नामे मिना शिंदे व छाया केदारे अशा आहेत. हे म्हणणे खरे नाही की, विजय जयवंत सगळगिळे यांचा विवाह झालेला नव्हता, ते अविवाहित मयत झाले.

२. विजय सगळगिळे याचा डिग्रस येथील महिला नामे उषा पवार हिच्याशी विवाह झाला होता. अंदाजे १०-२० वर्षापुर्वी त्यांचा विवाह झाला होता. त्यांचा विवाह केशवबन बेलापुर येथे झाला होता. मला त्यांच्या विवाहाची निश्चित तारीख सांगता येणार नाही. मी सदर विवाहास हजर होते. विजय सगळगिळे अंदाजे १० वर्षापुर्वी मयत झाले असतील. माझे दुसरे दिर संजय हे अविवाहित मयत झाले होते. माझे दोन्ही दिर विजय, संजय व सासु हे एकापाठोपाट ३ महिन्यात मयत झाले. वादी क्र. १ व २ हे डिग्रस येथे उषाचे आईवडिलांसोबत राहत होते. ते डिग्रस येथे कधीपासून राहत होते हे मला निश्चित सांगता येणार नाही. वादग्रस्त मिळकतीचे खरेदीखत हे कोणी कोणाला करून दिले हे मला सांगता येणार नाही. फेरफाराविरूध्द वादी यांनी उप विभागीय अधिकारी श्रीरामपुर यांच्याकडे अपील दाखल केल्याबद्दलचे मला वादीने त्यांच्याकडे गेल्यावर सांगितले. वादींना त्यांच्या जमिनीत प्रतिवादी क्र. १ तुळशीराम हे त्यांचा हिस्सा देत नाही. प्रतिवादी क्र. १ तुळशीराम हा माझे पुतण्या आहे.

३. प्रतिवादी क्र. १ याला प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी वादग्रस्त मिळकतीचे खरेदीखत करून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ३ याने त्याच्या

हिश्याचे क्षेत्र प्रतिवादी क्र. १ ला विकले. आम्ही ब-याच वर्षापासुन श्रीरामपुर येथे राहतो. वादीची आई उषा ही दावा मिळकतीमध्ये कधीच आली नाही. मी माझे प्रती प्रतिवादी क्र. ३ सोबतच राहते. मला माझ्या पतीने खरेदीखताबद्दल सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीला पैशाची आवश्यकता होती म्हणून त्यांनी त्यांचे क्षेत्र प्रतिवादी क्र. १ तुळशीराम यांना विकले. मी मयत विजय व उषा यांच्या विवाहाचे फोटोग्राफ दाखल करू शकते. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा वादग्रस्त मिळकतीशी संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी वादी व त्यांच्या मामाच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.02.23 16:26:53 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

(मयुर ए. पवार)

दिनांक:-२३/०२/२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.